महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ
डॉ.योगेश हनुमंत नरुटे, वैद्यकीय अधिकारी गट-अ, प्राथमिक आरोग्य केंद्र, बांदा, जि.सिंधुदुर्ग यांच्या राजीनाम्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः मवैअ २०१५/प्र.क्र. १०८३/सेवा ३
१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १५ जानेवारी, २०१६.

वाचा :

1) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः एसआरव्ही १०९२/१०३३/प्र.क्र. ३३/९२/८, दिनांक २.१२.१९९७.**
2) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः नानि २०१२/प्र.क्र. ३८१ (९००१४७०)/१२/ सेवा ३, दिनांक ४.७.२०१२**

प्रस्तावना :

उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक- २ येथील शासन निर्णयान्वये डॉ.योगेश हनुमंत नरुटे, वैद्यकीय अधिकारी गट-अ, प्राथमिक आरोग्य केंद्र, बांदा, जि.सिंधुदुर्ग यांची स्वतंत्र निवड मंडळामार्फत वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती झाली आहे. त्यांनी शासन सेवेतील त्यांच्या पदाचा राजीनामा दिनांक २९.८.२०१३ च्या अर्जान्वये दिलेला आहे. त्यांनी नियमानुसार एक महिन्याच्या मूळ वेतनाची रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा केलेली आहे. त्यानुसार त्यांचा राजीनामा मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

डॉ. योगेश हनुमंत नरुटे, वैद्यकीय अधिकारी गट-अ, प्राथमिक आरोग्य केंद्र, बांदा, जि.सिंधुदुर्ग यांनी एक महिन्याचे मूळ वेतन शासनाच्या तिजोरीत जमा करुन दिनांक २९.८.२०१३ रोजी दिलेली राजीनाम्याची सूचना उपरोक्त संदर्भ क्रमांक-१ येथील शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्याने त्यांचा राजीनामा दिनांक २९.८.२०१३ (म.पू.) रोजी स्विकारल्याचे समजण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११५१२०९०२६२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaskar Baburao Patil

Digitally signed by Bhaskar Baburao Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhaskar Baburao Patil
Date: 2016.01.15 14:11:35 +05'30'

(भा. बा. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई.
२) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर.
३) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४) उप संचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदुर्ग.
६) जिल्हा शल्य चिकित्सक, सिंधुदुर्ग.
७) जिल्हा आरोग्य अधिकारी, सिंधुदुर्ग.
८) डॉ. योगेश हनुमंत नरुटे, वैद्यकीय अधिकारी (उप संचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर यांच्यामार्फत.)
९) निवडनस्ती (सेवा ३).